दैनिक
# आरंभ मराठी
www.arambhmarathi.com

**सुविचार**

दुसऱ्यात दोष शोधण्यापेक्षा स्वतःला सुधारा.




■ कोल्हापूर ■ सांगली ■ सातारा ■ सोलापूर ■ धाराशिव ■ लातूर ■ वर्ष 3 रे ■ अंक 124 वा ■ गुरुवार, 30 जुलै 2026 ■ पाने 04 ■ किंमत रू.5 ■ epaper.arambhmarathi.com


# साडेपाच लाख लाडू विक्री, उत्पन्नापेक्षा खर्च अधिक; चितळेंना लाखो रूपयांचा फायदा

## आठ लाखांचे उत्पन्न, मंदिराचा अकरा लाख रूपये झाला खर्च

सूरज बागल । आरंभ मराठी

**तुळजापूर - तिरुपती बालाजी आणि शिर्डीच्या धर्तीवर सुरू करण्यात आलेल्या तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या लाडू प्रसाद सेवेला वर्षपूर्ती झाली असली तरी अपेक्षित प्रतिसाद मिळालेला नाही. २५ जुलै २०२५ रोजी सुरू झालेल्या या उपक्रमातून वर्षभरात साडेपाच लाखांच्या आसपास लाडूंची विक्री झाली आहे. मात्र दिवसाला हजारो भाविक येणाऱ्या तुळजापूरमध्ये ही विक्री समाधानकारक नसल्याचे दिसून येत आहे. ५० ग्रॅमच्या एका लाडूसाठी ३० रुपये आकारले जात असल्याने सर्वसामान्य भाविकांकडून नाराजी व्यक्त होत आहे. विक्रीतून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या तुलनेत कर्मचारी खर्च अधिक असल्याने मंदिर संस्थानला हा उपक्रम आर्थिकदृष्ट्या महाग पडत असल्याचे चित्र आहे.**

तिरुपती बालाजी व शिर्डीच्या धर्तीवर तीर्थक्षेत्र तुळजापूरात गतवर्षी तुळजाभवानी मंदिर संस्थानने लाडू प्रसाद सेवेचा शुभारंभ केला होता. गतवर्षी २५ जुलै रोजी या सेवेचा शुभारंभ करण्यात आला होता. जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार व देवीचे महंत यांच्या हस्ते या सेवेचा शुभारंभ करण्यात आला होता. तुळजाभवानी मंदिरात येणाऱ्या भाविकांना प्रसाद म्हणून सोबत घेऊन जाता यावा यासाठी हा लाडू प्रसाद सुरू करण्यात आला होता. मात्र लाडू प्रसादाच्या किंमतीवरून सुरुवातीपासूनच भाविकांची नाराजी दिसून आली. ५० ग्रॅम लाडूसाठी भाविकांना ३० रुपये शुल्क द्यावे लागत असल्याने पहिल्या वर्षभरात तरी भाविकांचा प्रतिसाद थंड दिसून येत आहे. पूर्ण वर्षभरात सरासरी साडेपाच लाख लाडू प्रसादाची विक्री झाली आहे. तुळजाभवानी मंदिरात वर्षाकाठी कोट्यवधी भाविक येत असतात. त्यामुळे येथे लाडू प्रसादास प्रचंड प्रतिसाद मिळेल असा विश्वास व्यक्त केला जात होता. दिवसाकाठी १५ ते २० हजार लाडू भाविक घेऊन जातील असा विचार करूनच हा लाडू प्रसाद सुरू करण्यात आला होता. मात्र लाडू प्रसाद हा जवळपास ६०० रुपये किलोने भाविकांना मिळत असल्याने याला भाविकांनी अल्प प्रमाणात प्रतिसाद दिलेला दिसून आला आहे. तसेच याची एक्सपायरी डेट ही पाच दिवसांची असल्याने अनेक भाविकांनी लाडू प्रसादाकडे पाठ फिरवलेली दिसून येत आहे. तुळजाभवानी मंदिरात येणारे भाविक बहुतांश करून सर्वसामान्य असतात. गोरगरीब, शेतमजूर, शेतकरी भाविक मोठ्या संख्येने तुळजापूरला येत असतात. त्यामुळे ३० रुपयांचा एक लाडू महाग वाटत असल्याचे भाविकांकडून सांगण्यात येत आहे. त्यामुळे मंदिर संस्थान या वर्षभरात मिळालेल्या थंड प्रतिसादानंतर तरी लाडू प्रसादाच्या किमतीबाबत पुनर्विचार करणार का? असा प्रश्न सर्वसामान्य भाविकांतून उपस्थित होत आहे.



### दिवसाला केवळ दीड हजार लाडूंची विक्री

२५ जुलै २०२५ रोजी या लाडू प्रसादाची सुरुवात करण्यात आली होती. पहिल्या अकरा महिन्यांचा विचार करता भाविकांनी एकूण ५ लाख १८ हजार ४१८ लाडू प्रसाद घेतले आहेत. या सरासरीनुसार महिन्याकाठी भाविक ४७ हजार लाडू घेत आहेत. तुळजाभवानी मंदिरात दिवसाकाठी हजारोंच्या संख्येने भाविक येत असतात. शनिवार, रविवार तसेच मंगळवार, शुक्रवार या दिवशी तर भाविकांची संख्या प्रचंड असते. त्यामुळे महिन्याकाठी सरासरी ४७ हजार लाडू विक्री होत असल्याने भाविकांचा प्रतिसाद थंड दिसून येत आहे.

### मंदिर संस्थानला तोटा; मात्र चितळे बंधूंना कोट्यवधींचा फायदा

दरम्यान, मंदिर संस्थानला या लाडू प्रसादामुळे नुकसान सहन करावे लागत असले तरी चितळे बंधूंची मात्र कोट्यवधींची कमाई झाली आहे. वर्षभरातील लाडू प्रसादाची विक्री पाहिल्यास चितळेंना यातून १ कोटी ५६ लाख रुपयांचे सरासरी उत्पन्न मिळाल्याचे दिसून येत आहे. एका लाडूसाठी २८ रुपये ५० पैसे हे चितळे बंधूंना दिले जातात.



### वर्षभरात अशी झाली लाडू विक्री

२५ जुलै ते ३० ऑगस्ट – ४२ हजार ७१७
सप्टेंबर – ४५ हजार ७९५
ऑक्टोबर – ३६ हजार २३६
नोव्हेंबर – ३३ हजार ९४८
डिसेंबर – ६९ हजार ९०३
जानेवारी – ६१ हजार ७७५
फेब्रुवारी – ४१ हजार ५४९
मार्च – ४३८४१
एप्रिल – ४३०४२
मे – ४३५२२
जून – ५६०९०

लाडू विक्रीमध्ये जुलैची सरासरी आकडेवारी धरल्यास वर्षभरात एकूण साडेपाच लाखांच्या आसपास लाडू प्रसादाची विक्री झालेली दिसून येत आहे.

### उत्पन्नापेक्षा खर्च अधिक; मंदिर संस्थानला लाडू प्रसाद महाग पडला

वर्षभरात सरासरी साडेपाच लाख लाडू प्रसादाची विक्री झाली असल्याने मंदिर संस्थानला यातून ८ लाख रुपयांच्या आसपास उत्पन्न मिळाले आहे. मात्र मंदिर संस्थानने यासाठी तीन काउंटर सुरू केले असून यामध्ये दोन शिफ्टमध्ये सहा कर्मचारी काम करतात. एका कर्मचाऱ्यांचा पगार सरासरी महिन्याला १५ हजार रुपये धरला तरी मंदिर संस्थानकडून १० लाख ८० हजार रुपये हे कर्मचाऱ्यांच्या पगारावर खर्च झाले आहेत. त्यामुळे मंदिर संस्थानला हा लाडू प्रसाद महाग पडल्याचे दिसून येत आहे.

## गुरुपौर्णिमेच्या शुभमुहूर्तावर श्री सिध्दीविनायक परिवारातील कारखान्यांचे मिल रोलर पूजन



आरंभ मराठी । धाराशिव

गुरुपौर्णिमेच्या पावन आणि शुभमुहूर्तावर श्री सिध्दीविनायक ॲग्रीटेक इंडस्ट्रीज लिमिटेड, देवकुरुळी (युनिट क्र. १) तसेच श्री सिध्दीविनायक ग्रीनटेक इंडस्ट्रीज लिमिटेड, खामसवाडी (युनिट क्र. २) या दोन्ही कारखान्यांमध्ये गळीत हंगाम २०२६-२७ च्या मिल रोलर पूजनाचा विधीवत समारंभ उत्साहात पार पडला. श्री सिध्दीविनायक परिवाराचे संस्थापक दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या मातोश्री श्रीमती मीनाताई कुलकर्णी यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यावेळी दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या पत्नी दिपाली कुलकर्णी, बालाजी कोरे, दिनेश कुलकर्णी, प्रतिक देवळे, गणेश कामटे, राजकुमार जाधव, अरविंद गोरे, मंगेश कुलकर्णी, प्रथमेश आवटे, विकास उबाळे यांच्यासह कारखान्यांचे विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, ऊस वाहतूकदार तसेच शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आगामी गळीत हंगाम यशस्वी करण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन केले.

शेतकरी हिताला सर्वोच्च प्राधान्य देत आधुनिक तंत्रज्ञान, कार्यक्षम व्यवस्थापन आणि गुणवत्तापूर्ण सेवांच्या बळावर हंगाम २०२६-२७ अधिक यशस्वी करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. मिल रोलर पूजनानंतर कारखाना व्यवस्थापनाने आगामी गळीत हंगामासाठी आवश्यक सर्व तयारी पूर्ण झाल्याचा विश्वास व्यक्त केला.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांना वेळेवर आणि दर्जेदार सेवा देण्याबरोबरच कार्यक्षम गाळप प्रक्रियेद्वारे हंगाम यशस्वी करण्यासाठी श्री सिध्दीविनायक परिवार सज्ज असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## एनसीएमसी स्मार्ट कार्ड सक्तीला १ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ ; ज्येष्ठ नागरिक व महिलांना मोठा दिलासा

**धाराशिव** :- एसटी प्रवासातील शासनाच्या विविध प्रवासी सवलतींचा लाभ घेण्यासाठी एनसीएमसी (NCMC) स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्याच्या निर्णयाला राज्य शासनाने १ सप्टेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. अनेक ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना अद्याप स्मार्ट कार्ड प्राप्त झाले नसल्याने त्यांची गैरसोय टाळण्यासाठी परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी हा निर्णय घेतला आहे. राज्य शासनामार्फत अमृत ज्येष्ठ नागरिकांना एसटीत मोफत प्रवासाची, तर ज्येष्ठ नागरिक आणि



महिलांना प्रवास भाड्यात ५० टक्के सवलत दिली जाते. या सवलती अधिक पारदर्शक, सुलभ आणि तंत्रज्ञानाधारित पद्धतीने देण्यासाठी १ ऑगस्टपासून एनसीएमसी स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

मात्र, अनेक पात्र प्रवाशांनी स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली असली तरी त्यांना अद्याप प्रत्यक्ष कार्ड मिळालेले नाही. त्यामुळे केवळ कार्ड उपलब्ध नसल्यामुळे पात्र प्रवासी शासनाच्या सवलतींपासून वंचित राहू नयेत, यासाठी एनसीएमसी स्मार्ट कार्डची सक्ती १ सप्टेंबरपर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे. याबाबत मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, एसटी प्रवासी सवलत ही सर्वसामान्यांच्या हितासाठी आहे. तांत्रिक किंवा प्रक्रियात्मक कारणांमुळे कोणत्याही पात्र ज्येष्ठ नागरिक अथवा महिला प्रवाशाची गैरसोय होऊ नये, ही शासनाची भूमिका आहे.

## उमरग्यात जनावरांची वाहतूक करणाऱ्या व्यक्तीवर गुन्हा दाखल

### पावणे तीन लाखांचा मुद्देमाल जप्त

आरंभ मराठी । उमरगा

उमरगा तालुक्यात गोवंशाची निर्दयपणे वाहतूक करणाऱ्या एका वाहनावर उमरगा पोलिसांनी कारवाई करत वाहनासह २ लाख ८४ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध प्राण्यांशी क्रूरतेने वागण्यास प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अजयकुमार विठ्ठल मुलगे (वय ३०, रा. किणी सुलतान, ता. आळंद, जि. कलबुर्गी) हा दि. २८ जुलै २०२६ रोजी दुपारी कसगी ते जवळगा मार्गावरील काशिनाथ गुरव यांच्या शेताजवळ अशोक लेलँड बडा दोस्त (क्र. KA-32-C-0721) या वाहनातून पाच गोवंशीय जनावरांची वाहतूक करत होता. वाहनामध्ये जनावरांना चारापाणी न देता तसेच दाटीवाटीने भरून त्यांची निर्दयपणे वाहतूक करण्यात येत असल्याची माहिती मिळाल्यानंतर उमरगा पोलिसांनी छापा टाकून कारवाई केली. यावेळी ८४ हजार किमतीची पाच गोवंशीय जनावरे व २ लाख किमतीचे वाहन असा एकूण २ लाख ८४ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी आरोपीविरुद्ध प्राण्यांशी क्रूरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम, १९६० मधील कलम ११(१)(ड), ११(१)(ई) तसेच प्राण्यांच्या परिवहन नियम, १९७८ मधील नियम ४७, ५४ व ५६ अन्वये उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**आरंभ मराठी** ४७,८८६ शेतकऱ्यांची यादी प्रसिद्ध; 'आपले सरकार' सेवा केंद्रावर आधार प्रमाणीकरण करण्याचे आवाहन

## कर्जमाफीच्या यादीतील रकमेबाबत संभ्रम करून घेऊ नका, आधार प्रमाणीकरणानंतर मिळणार संपूर्ण लाभ

आरंभ मराठी । धाराशिव

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत प्रसिद्ध करण्यात आलेल्या लाभार्थी यादीतील कर्जमाफीच्या रकमेबाबत शेतकऱ्यांनी कोणताही संभ्रम बाळगू नये. यादीत दर्शविण्यात आलेली रक्कम ही रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या एनपीए (हेअरकट) धोरणानुसार नमूद करण्यात आली असून, आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पात्र शेतकऱ्यांना रुपये दोन लाखांपर्यंतच्या संपूर्ण कर्जमाफीचा लाभ मिळणार असल्याचे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धाराशिव यांनी स्पष्ट केले आहे.

शासनाने जाहीर केलेल्या या योजनेअंतर्गत २५ जुलै रोजी धाराशिव जिल्ह्यातील ४७ हजार ८८६ शेतकऱ्यांची कर्जमाफीची पहिली यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. ही यादी जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत आणि तलाठी कार्यालयांमध्ये उपलब्ध करून देण्यात आली असून, आणखी ५० ते ५१ हजार शेतकऱ्यांची




यादी पुढील १५ दिवसांत प्रसिद्ध होणार आहे. दरम्यान, काही शेतकऱ्यांनी यादीत दाखविलेली कर्जरक्कम प्रत्यक्ष थकबाकीपेक्षा कमी असल्याची तक्रार केली होती.

याबाबत प्रशासनाने स्पष्टीकरण देताना सांगितले की, राष्ट्रीयीकृत आणि व्यापारी बँकांसाठी रिझर्व्ह बँकेच्या एनपीए (हेअरकट) धोरणानुसार यादीतील रक्कम दर्शविण्यात आली आहे. त्यामुळे ती संबंधित कर्जखात्यातील प्रत्यक्ष थकबाकीपेक्षा कमी दिसू शकते.

मात्र, शेतकऱ्यांनी 'आपले सरकार' सेवा केंद्रावर जाऊन आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर पोर्टलवर पात्रतेनुसार संपूर्ण कर्जमाफीची रक्कम दिसून येणार आहे. तसेच त्या रकमेची प्रमाणित प्रतही शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली जाणार आहे.

त्यामुळे प्रसिद्ध यादीतील रक्कम पाहून कोणताही चुकीचा निष्कर्ष काढू नये, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. आधार प्रमाणीकरणासाठी शेतकऱ्यांनी यादीवरील विशिष्ट क्रमांक, ॲग्रीस्टॅक क्रमांक आणि आधार कार्ड घेऊन 'आपले सरकार' सेवा केंद्रावर जावे.

तेथे कर्ज खाते क्रमांक, कर्जाची रक्कम आणि आधार क्रमांकाची पडताळणी करून आधार प्रमाणीकरण पूर्ण करावे. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शासनाकडून कर्जमाफीची रक्कम मंजूर होईल आणि संबंधित शेतकरी पुढील पीककर्जासाठीही पात्र ठरणार आहेत. योजनेतील नाव तपासणे, अपात्रतेची कारणे जाणून घेणे, तक्रारींचे निराकरण तसेच मार्गदर्शनासाठी राज्य शासनाने (०२२) ४९१५०८०२ हा हेल्पलाईन क्रमांक उपलब्ध करून दिला आहे. या क्रमांकावर संपर्क साधून शेतकरी आपल्या शंकांचे निरसन करून घेऊ शकतात. जिल्ह्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांनी विलंब न करता 'आपले सरकार' सेवा केंद्रावर जाऊन आधार प्रमाणीकरण पूर्ण करून शासनाच्या कर्जमाफी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धाराशिव यांनी केले आहे.

## गुरुपौर्णिमेनिमित्त श्री येडेश्वरी मंदिरात विक्रमी गर्दी

आरंभ मराठी । येरमाळा

गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त येरमाळा येथील श्री येडेश्वरी देवी मंदिरात दर्शनासाठी भाविकांनी विक्रमी गर्दी केली. पहाटेपासूनच महाराष्ट्रातील विविध भागांसह परराज्यातूनही हजारो भाविक मंदिरात दाखल झाल्याने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला. दर्शनासाठी भाविकांना तब्बल सहा तास प्रतीक्षा करावी लागली, तर मंदिरापासून सुमारे दीड किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. यंदा गुरुपौर्णिमेनिमित्त झालेली गर्दी ही दरवर्षी नारळी पौर्णिमेला होणाऱ्या गर्दीइतकी, किंबहुना त्याहून अधिक असल्याचे चित्र दिसून आले. सकाळपासूनच दर्शनासाठी लांबच लांब रांगा लागल्या होत्या. मंदिरात प्रवेश केल्यानंतर दर्शनमंडपातून देवीचे दर्शन घेण्यासाठी सुमारे सहा तासांचा कालावधी लागत होता. गुरुपौर्णिमेच्या दिवशी झालेली ही आतापर्यंतची सर्वाधिक गर्दी असल्याची भावना अनेक भाविकांनी व्यक्त केली. भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने मंदिर परिसरातील सर्व रस्ते वाहनांनी फुलून गेले. मंदिरापासून एक ते दीड किलोमीटरपर्यंत चारचाकी आणि दुचाकी वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. वाहनतळ पूर्ण भरल्याने अनेक भाविकांना दूरवर वाहने उभी करून पायी मंदिर गाठावे लागले. भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी मंदिर प्रशासन, स्वयंसेवक आणि पोलिसांनी विशेष नियोजन केले होते. दर्शन व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या होत्या.



भाविकांनीही संयमाने रांगेत उभे राहून देवीचे दर्शन घेतले. दिवसभर मंदिर परिसरात 'आई राजा उदे उदे'च्या जयघोषाने भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. रात्री गुरुपौर्णिमेनिमित्त पारंपरिक छबीना सोहळाही उत्साहात पार पडला. रात्री उशिरापर्यंत दर्शन सुरू असूनही भाविकांची गर्दी कायम होती आणि उशिरापर्यंत भाविक दर्शनासाठी रांगेत उभे असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# श्री तुळजाभवानी मंदिरातील जीर्णोद्धार कामांसाठी विशेष मंत्रपठण विधी

## गुरुपौर्णिमेनिमित्त महंतांचा सन्मान

**आरंभ मराठी । तुळजापूर**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी देवीच्या मंदिरात सुरू असलेल्या जीर्णोद्धार व विकासकामांना धार्मिक अधिष्ठान लाभावे तसेच ही सर्व कामे निर्विघ्न, सुरळीत आणि यशस्वीरीत्या पूर्ण व्हावीत, या उद्देशाने बुधवारी (दि. २९) मंदिरात विशेष मंत्रपठण व विविध धार्मिक विधी संपन्न झाले. या धार्मिक कार्यक्रमात गणपती अथर्वशीर्ष पारायण, श्रीरुद्र जप तसेच दुर्गा सप्तशती पारायण करण्यात आले. सकाळी ७ ते ८ या वेळेत उजव्या सोंडेच्या श्री गणपतीचा अभिषेक उपाध्ये पुजारी मंडळाचे अध्यक्ष अनंत कोंडो यांनी सपत्नीक यजमान म्हणून केला. त्यानंतर सकाळी ८ ते ९ या वेळेत भवानी-शंकर मंदिरात रुद्राभिषेक पार पडला. या विधीसाठी पाळीकर पुजारी मंडळाचे अध्यक्ष विपीन शिंदे हे सपत्नीक



यजमान म्हणून उपस्थित होते. दरम्यान, श्री तुळजाभवानी देवींच्या अभिषेक व संकल्प विधीसाठी भोपे पुजारी मंडळाचे अध्यक्ष अमरराजे कदम यांनी सपत्नीक यजमान म्हणून सहभाग घेतला. श्री देवींचे मळवट चोपल्यानंतर तिन्ही यजमानांच्या हस्ते देवीची महाआरती करण्यात आली. सर्व धार्मिक विधी पूर्ण झाल्यानंतर श्री गणेश विहार येथे उपस्थित ब्राह्मणवृंदांना विधीवत वर्णी देण्यात आली.मंदिरातील जीर्णोद्धार व विकासकामे निर्विघ्न आणि यशस्वीरीत्या पूर्ण व्हावीत, यासाठी परमपूज्य जगद्गुरू शंकराचार्य श्री श्री भारती तीर्थ महासन्निधानम्, शृंगेरी शारदा पीठ यांचे मार्गदर्शन घेण्यात आले होते. त्यांनी सुचविलेल्या धार्मिक विधींनुसार विश्वस्त मंडळ, मंदिर प्रशासन, महंत तसेच तिन्ही पुजारी मंडळांच्या अध्यक्षांशी विचारविनिमय करून हा धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन), धार्मिक व्यवस्थापक, महंत तुकोजीबुवा, महंत चिलोजीबुवा, सरकारी उपाध्ये सुनीत पाठक, मंदिर संस्थानचे कर्मचारी, पुजारी बांधव आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याचबरोबर गुरुपौर्णिमेनिमित्त पूर्वापार चालत आलेल्या परंपरेनुसार महंत तुकोजीबुवा व महंत चिलोजीबुवा यांचा मंदिर संस्थानच्या वतीने आहेर देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.

# श्री क्षेत्र अचलबेट देवस्थानात गुरुपौर्णिमेनिमित्त घोड्यांचे गोल रिंगण



**आरंभ मराठी । उमरगा**

उमरगा तालुक्यातील कराळी-तुरोरी परिसरातील श्री क्षेत्र अचलबेट देवस्थानाच्या पायथ्याशी गुरुपौर्णिमेनिमित्त घोड्यांचे गोल रिंगण सोहळा बुधवारी (दि.२९) सायंकाळी उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. हजारो वारकरी व भाविक भक्तांच्या उपस्थितीत झालेल्या या सोहळ्याने परिसर विठ्ठल नामाच्या गजराने दुमदुमून गेला. गुरुपौर्णिमेच्या औचित्याने औराद शहाजानी (ता. निलंगा) येथून सोमवार (दि.२७) रोजी सद्गुरु उज्वलानंद महाराज यांच्या पादुकांची पालखी सोहळ्याला सुरुवात झाली. रथ, नगारा, टाळकरी, वारकरी, पताकाधारी, विणेकरी यांच्या सहभागाने निघालेली पालखी निलंगा, कासारशिरसी, मुळज, तुरोरी मार्गे अचलबेट देवस्थानाच्या पायथ्याशी दाखल झाली. दरम्यान, बुधवारी सकाळपासून विविध गावांमधून पालख्या अचलबेट देवस्थानाच्या पायथ्याशी दाखल झाल्या. कर्नाटक राज्यातील बसवकल्याण तालुक्यातील एकंबा येथील पालखी मळगी, चिंचकोक, तुरोरी मार्गे आली. नवचंदवाडी येथील पालखी कर्नाटक बॉर्डर, तलमोड मार्गे तर मळगीवाडी येथील पालखी आष्टा, तुरोरी मार्गे अचलबेट येथे दाखल झाली.चारही पालख्यांचे आगमन झाल्यानंतर टाळ-मृदंगाच्या गजरात आणि सद्गुरुंच्या जयघोषात घोड्यांचे गोल रिंगण सोहळा पार पडला. या रिंगणामध्ये एका घोड्यावर चोपदार तर दुसऱ्या घोड्यावर सद्गुरु उज्वलानंद महाराज यांच्या पादुका ठेवण्यात आल्या होत्या. भाविकांनी या भक्तिमय सोहळ्याचा मोठ्या उत्साहात आनंद घेतला.गुरुपौर्णिमेनिमित्त सायंकाळी ७ ते रात्री ९ वाजेपर्यंत हभप अनिल महाराज पाटील (बार्शी) यांचे सुश्राव्य कीर्तन आयोजित करण्यात आले होते.

# जाती-जातीत फूट पाडण्यासाठी सरकारकडून एससी उपवर्गीकरणाचे प्रयत्न

## आनंदराज आंबेडकर यांचा सरकारवर आरोप

**आरंभ मराठी । धाराशिव**

अनुसूचित जाती (एससी) प्रवर्गातील उपवर्गीकरणाच्या विरोधात मंगळवारी धाराशिव शहरात भव्य महामोर्चा व एल्गार आंदोलन काढण्यात आले. या मोर्चाला उपस्थित राहण्यासाठी उपस्थित राहिलेल्या आनंदराज आंबेडकर यांनी पत्रकार परिषदेत त्यांची भूमिका स्पष्ट केली. यावेळी आंबेडकर यांनी एससी उपवर्गीकरणाला विरोध दर्शवत राज्य सरकारवर समाजात फूट पाडत असल्याचा गंभीर आरोप केला. आनंदराज आंबेडकर म्हणाले की, अनुसूचित जातीमधील सर्व ५९ जाती उपवर्गीकरणाच्या विरोधात असून, संपूर्ण महाराष्ट्रात या निर्णयाविरोधात तीव्र जनआंदोलन उभे राहत आहे. सरकार 'फोडा, झोडा आणि राज्य करा' या धोरणाने काम करत असून, मराठा-ओबीसी समाजामध्ये जसा संघर्ष निर्माण करण्यात आला, तसाच वाद आता इतर समाजांमध्ये निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला. उपवर्गीकरणाची



कुणीही मागणी केलेली नसताना केवळ जातीजातीत तेढ निर्माण करण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतल्याचा दावा त्यांनी केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वोच्च न्यायालयाने उपवर्गीकरण करण्यास सांगितल्याचे विधान केले होते. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने जिथे अशी मागणी असेल तिथेच उपवर्गीकरणाचा विचार करता येईल, असे निर्देश दिले होते. मुख्यमंत्री न्यायालयाच्या निर्णयाचा चुकीचा अर्थ लावत असल्याचा आरोपही त्यांनी केला. यावेळी त्यांनी सर्वोच्च न्यायालयालाही राज्यांना अशा प्रकारचे चुकीचे निर्देश देऊ नयेत, अशी विनंती केली. पंजाब उच्च न्यायालयानेही उपवर्गीकरणाला विरोध दर्शविल्याचा उल्लेख करत, २०१४ नंतर सर्वोच्च न्यायालयाची भूमिका देखील संशयास्पद वाटत असल्याचे वक्तव्य त्यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अनुसूचित जातींना स्वतंत्र दलित वर्ग म्हणून आरक्षण दिले असून, हा वर्ग हिंदू धर्माचा भाग नसल्याचे त्यांनी सांगितले होते. अनुसूचित जातींना ऐतिहासिकदृष्ट्या जातीयवादाचे चटके बसले असून त्यांचा इतर कोणत्याही जातीशी संबंध जोडण्याचा प्रयत्न चुकीचा असल्याचे आंबेडकर म्हणाले. सर्वोच्च न्यायालय किंवा संसद यांच्यापेक्षा जनता मोठी आहे, असे सांगत त्यांनी परभणी, जालना, सोलापूर, मुंबई आदी ठिकाणी झालेल्या आंदोलनांचा उल्लेख केला. राज्यभरातून उपवर्गीकरणाविरोधात मोठ्या प्रमाणावर जनक्षोभ व्यक्त होत असल्याने सरकारने वेळीच हा निर्णय मागे घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. राज्यात सुमारे अडीच लाख शासकीय पदे रिक्त असून पदोन्नतीचे प्रश्नही प्रलंबित आहेत. हे प्रश्न सोडविण्याऐवजी सरकार समाजात फूट पाडण्याचे काम करत असल्याचा आरोप त्यांनी केला. काही मंडळी मनुवादी विचारांच्या प्रभावाखाली काम करत असल्याचा दावा करत, मातंग समाजाला आमचा कोणताही विरोध नसून सरकारच समाजात वाद निर्माण करण्याचा प्रयत्न करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या पत्रकार परिषदेला धनंजय शिंगाडे, राजाभाऊ ओव्हाळ यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्ह्यात दूध भेसळीविरोधात धडक मोहीम; दोन दूध नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले

### दूध भेसळ करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा; नागरिकांनी टोल-फ्री क्रमांकावर तक्रार करण्याचे आवाहन

**आरंभ मराठी । धाराशिव**

जिल्ह्यात दूध व दुग्धजन्य पदार्थांतील भेसळ रोखण्यासाठी प्रशासनाने धडक मोहीम सुरू केली असून, धाराशिव तालुक्यातील दोन दूध संकलन केंद्रांवर तपासणी करत दूधाचे नमुने प्रयोगशाळेत विश्लेषणासाठी पाठविण्यात आले आहेत. दूध भेसळीमुळे शेतकऱ्यांच्या दुधाला योग्य दर मिळत नसल्याबरोबरच नागरिकांच्या आरोग्यावरही गंभीर परिणाम होत असल्याने जिल्हा प्रशासनाने या प्रकरणात कठोर भूमिका घेतली आहे. नागरिकांना स्वच्छ व गुणवत्तापूर्ण दूध उपलब्ध व्हावे, यासाठी कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विकास विभागाच्या निर्देशानुसार अप्पर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय दूध भेसळ प्रतिबंधक समिती कार्यरत आहे. समितीमार्फत पोलीस प्रशासन, अन्न व औषध प्रशासन, पशुसंवर्धन विभाग, वैद्यमापन शास्त्र विभाग आणि जिल्हा दुग्धव्यवसाय विकास कार्यालय यांच्या समन्वयातून नियोजनबद्ध व गोपनीय कारवाया सुरू आहेत. या मोहिमेअंतर्गत २२ जुलै रोजी धाराशिव तालुक्यातील वरुडा रोडवरील डोडला डेअरी केंद्राची तपासणी करण्यात आली. येथे सकाळ व सायंकाळ मिळून सुमारे १२ हजार लिटर दूध संकलन होत असल्याचे नोंदीत आढळले. या केंद्रावरून गायीच्या दुधाचा एक नमुना तपासणीसाठी घेण्यात आला. त्यानंतर एमआयडीसी परिसरातील शुअर सखी युनिक रियल इंटरप्रायजेस या दूध संकलन केंद्राचीही तपासणी करण्यात आली. येथे गायीचे सुमारे २,६०० लिटर व म्हशीचे ५०० लिटर दूध संकलित होत असल्याचे निदर्शनास आले. या केंद्रावरूनही गायीच्या दुधाचा एक नमुना घेण्यात आला. दोन्ही नमुने अन्न व औषध प्रशासनामार्फत प्रयोगशाळेत विश्लेषणासाठी पाठविण्यात आले असून, अहवालानुसार पुढील कारवाई करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील दूध विक्रेते, सहकारी व खासगी दूध संकलन केंद्रे, दूध प्रक्रिया प्रकल्प तसेच दुग्धजन्य पदार्थ विक्रेत्यांकडे सातत्याने तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. सर्व संबंधितांनी भेसळमुक्त व उच्च गुणवत्तेचे दूध स्वीकारून विक्री करावी, वजनकाटे व दूध तपासणी यंत्रणा प्रमाणित व अद्ययावत ठेवाव्यात, तसेच दुग्धजन्य पदार्थांवर उत्पादन दिनांक व वापराची अंतिम मुदत स्पष्टपणे नमूद करावी, असे आवाहन समितीने केले आहे. नागरिकांनी दूध भेसळीबाबत कोणतीही माहिती अथवा तक्रार असल्यास एफएसएसएआयच्या टोल-फ्री क्रमांक १८०० २२ २३६५ वर संपर्क साधावा, असे आवाहन अप्पर जिल्हाधिकारी, अप्पर पोलीस अधीक्षक, जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी आणि सहाय्यक आयुक्त (अन्न), अन्न व औषध प्रशासन यांनी केले आहे.

# जिल्ह्यात NSUI च्या तालुका व शहराध्यक्षांच्या नियुक्त्या जाहीर

**धाराशिव :-** भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'संघटन सृजन' अभियानाच्या अनुषंगाने राष्ट्रीय विद्यार्थी संघटना (NSUI) च्या धाराशिव जिल्ह्यातील विविध तालुका व शहराध्यक्षांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. अखिल भारतीय काँग्रेस कमिटी (AICC) चे नियुक्त निरीक्षक, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे निरीक्षक, धाराशिव जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तसेच NSUI जिल्हाध्यक्ष यांच्या शिफारशीनुसार या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. या नियुक्त्यांना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि NSUIचे राष्ट्रीय अध्यक्ष विनोद जाखड यांनी मान्यता दिली आहे. नवीन नियुक्त पदाधिकाऱ्यांमध्ये भूम – अमृता भागवत शिंदे, वाशी – ओमकार उंदरे, धाराशिव शहर – मनसूर मकबूल सय्यद, उमरगा – योगेंद्र राजेंद्र माने, उमरगा शहर – गणेश अनिल सूर्यवंशी, लोहारा – अमित विरोधे, कळंब – ऋषिकेश टकले, परंडा – अजित अनिल जरांगे, परंडा शहर – सय्यद शादाब राहीद आणि नळदुर्ग शहर – रहमान शेख यांचा समावेश आहे. नियुक्त करण्यात आलेल्या पदाधिकाऱ्यांनी NSUI ची संघटनात्मक बांधणी मजबूत करणे, विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांवर प्रभावीपणे आवाज उठवणे, महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावर संघटनेचा विस्तार करणे तसेच काँग्रेसच्या विचारधारेचा विद्यार्थ्यांमध्ये प्रसार करण्यासाठी सक्रियपणे कार्य करावे, असे नियुक्तीपत्रात नमूद करण्यात आले आहे. नवीन कार्यकारिणी जाहीर झाल्यानंतर काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून नवनियुक्त NSUI पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील विद्यार्थी संघटना अधिक सक्षम व प्रभावी होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# शेतकऱ्यांसाठी डिजिटल क्रांती; पीक-पाणी माहिती आता मोबाईलवर

**धाराशिव :-** जिल्ह्यातील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतजमिनीवरील पीक आणि पाणी परिस्थितीची अद्ययावत माहिती आता थेट मोबाईलवर उपलब्ध होणार आहे. कृषी विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय धाराशिव आणि आयआयटी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने Geo-spatial Agriculture Planning Platform for Climate Resilient Dharashiv हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यात येत असून, त्याअंतर्गत हा अभिनव उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या प्रकल्पांतर्गत जिल्ह्यातील फॉर्मर आयडी असलेल्या आणि ॲग्रीस्टॅक मधील गटाची माहिती गावाच्या गट नकाशांशी जुळलेल्या सुमारे दोन लाख शेतकऱ्यांना २४ व २५ जुलै २०२६ रोजी जिल्हा प्रशासनाकडून एसएमएसद्वारे विशेष लिंक पाठविण्यात आली आहे. या लिंकच्या माध्यमातून शेतकऱ्यांना त्यांच्या वैयक्तिक शेतजमिनीची दररोजची माहिती पाहता येणार आहे. या लिंकवर शेतकऱ्यांना मातीतील ओलावा, पिकाची सद्यस्थिती, पुढील सात दिवसांचा हवामान अंदाज तसेच त्या आधारे पेरणी, सिंचन आणि कीड-रोग व्यवस्थापनाबाबत वैज्ञानिक सल्ला उपलब्ध होणार आहे. प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, एसएमएस दररोज पाठविण्यात येणार नसला तरी त्यातील लिंक दररोज अद्ययावत केली जाईल. त्यामुळे शेतकऱ्यांनी हा संदेश किंवा लिंक जतन करून ठेवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. आयआयटी मुंबईने विकसित केलेल्या 'वॉटर बजेट' मॉडेल आणि स्कायमेटच्या हवामान अंदाजाच्या आधारे हे विश्लेषण तयार करण्यात येत असून, त्यावर आधारित मार्गदर्शन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर वैज्ञानिक आणि शाश्वत शेतीला चालना देण्यासाठी जिल्ह्यात प्रथमच अशा प्रकारचा तंत्रज्ञानाधारित उपक्रम राबविण्यात येत आहे.

# 'आरंभ मराठी'च्या वृत्ताची दखल; तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वाहनावर अखेर नंबर प्लेट बसवली

**आरंभ मराठी । तुळजापूर**

तीर्थक्षेत्र तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या पाणी वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनावर नंबर प्लेट नसल्याची बाब 'आरंभ मराठी'ने दिनांक १८ जुलैच्या अंकातून उघडकीस आणल्यानंतर अखेर मंदिर संस्थानने या वृत्ताची दखल घेत संबंधित वाहनावर नंबर प्लेट बसवली आहे. त्यामुळे 'आरंभ मराठी'च्या वृत्तानंतर प्रशासनाने आवश्यक कारवाई केल्याचे स्पष्ट झाले आहे. तुळजापूर येथील आयडीबीआय बँकेच्या सीएसआर निधीतून मंदिर संस्थानला मार्च महिन्यात एक इलेक्ट्रिक चारचाकी 'छोटा हत्ती' वाहन उपलब्ध करून देण्यात आले होते. हे वाहन मंदिर परिसरात व शहरातील विविध ठिकाणी पाणी वाहतुकीसाठी वापरले जात होते. मात्र, गेल्या दोन ते तीन



दैनिक आरंभ मराठी
18 Jul 2026 - Page 1
epaper.arambhmarathi.com

आरंभ मराठी भाविकांवर नियम, पण संस्थानच्या वाहनाला सूट; विना नंबर प्लेटच्या वाहनावर कारवाईची मागणी

तुळजाभवानी मंदिर संस्थानकडून वाहतूक नियमांची पायमल्ली; विना नंबर प्लेटचे वाहन तुळजापुरात सुसाट

वाहतूक शाखेकडून कारवाई का नाही?

तुळजापूर वाहतूक शाखेकडूनही या वाहनावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. सर्वसामान्य नागरिक, भाविक तसेच नो-पार्किंगमध्ये उभी केलेली वाहने यांच्यावर नियमित दंडात्मक कारवाई केली जाते. मात्र मंदिर संस्थानच्या विना नंबर प्लेटच्या वाहनाबाबत वाहतूक शाखा उदासीन का आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. कोणत्याही नागरिकाने नवीन वाहन खरेदी केल्यानंतर नियमानुसार नंबर प्लेट लावणे बंधनकारक असते. अन्यथा संबंधित वाहनावर कारवाई केली जाते. असे असताना मंदिर संस्थानचे हे विना नंबर प्लेटचे वाहन तुळजापूर शहर व परिसरात नियमितपणे धावत असल्याचे दिसून येत आहे. भविष्यात या वाहनामुळे एखादा अपघात किंवा दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा सवालही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

आरंभ मराठी । तुळजापूर

तीर्थक्षेत्र तुळजापुरात तुळजाभवानी मंदिरामध्ये येणाऱ्या भाविकांना, पुजाऱ्यांना तसेच वाहनधारकांना वाहतुकीचे नियम पाळण्यास भाग पाडणाऱ्या तुळजाभवानी मंदिर संस्थानकडूनच वाहतूक नियमांची पायमल्ली होत असल्याचा आरोप केला जात आहे. मंदिर संस्थानच्या पिण्याच्या पाण्याच्या वाहतुकीसाठी वापरले जाणारे इलेक्ट्रिक चारचाकी वाहन गेल्या दीड ते दोन महिन्यांपासून विना नंबर प्लेट शहरात सुसाट धावत असल्याचे निदर्शनास आले असून, याप्रकरणी संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी नागरिक आणि भाविकांतून होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तुळजाभवानी मंदिराचे संपूर्ण व्यवस्थापन तुळजाभवानी मंदिर संस्थानकडून केले जाते. आयडीबीआय बँक, तुळजापूर शाखेने आपल्या सीएसआर निधीतून सुमारे दीड ते दोन महिन्यांपूर्वी मंदिर संस्थानला एक इलेक्ट्रिक चारचाकी छोटा हत्ती वाहन उपलब्ध करून दिले. सध्या हे वाहन मंदिर परिसरात आणि शहरात पिण्याच्या पाण्याची वाहतूक करण्यासाठी वापरले जात आहे. मात्र या वाहनाला पुढील व मागील बाजूस नंबर प्लेटच नसल्याचे दिसून येत आहे. गेल्या दीड ते दोन महिन्यांपासून हा प्रकार सुरू असून, याकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष का होत आहे, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. विशेष म्हणजे, तुळजाभवानी मंदिर संस्थानकडून भवानी रोडसह विविध ठिकाणी वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या भाविकांच्या दुचाकी वाहने उचलून पोलीस ठाण्यात जमा केली जातात. त्यानंतर संबंधित भाविकांना दंड भरल्यानंतरच आपले वाहन परत मिळते. मात्र दुसरीकडे संस्थानचेच वाहन विना नंबर प्लेट रस्त्यावर धावत असल्याने भाविकांमध्ये नाराजी आणि संताप व्यक्त होत आहे. नियम सर्वांसाठी समान असताना संस्थानच्या वाहनाला वेगळी वागणूक का दिली जात आहे, असा सवालही उपस्थित केला जात आहे.



महिन्यांपासून हे वाहन कोणतीही नंबर प्लेट नसताना शहरातील रस्त्यांवर सर्रास फिरत असल्याचे निदर्शनास आले होते. मोटार वाहन कायद्यानुसार कोणतेही वाहन नोंदणी क्रमांकाविना सार्वजनिक रस्त्यावर चालविण्यास मनाई असताना संबंधित वाहनावर वाहतूक शाखेकडून कोणतीही कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये आश्चर्य व्यक्त केले जात होते. याबाबत 'आरंभ मराठी'ने १८ जुलैच्या अंकात ठळक वृत्त प्रसिद्ध करून हा प्रकार समोर आणला होता. या वृत्तानंतर मंदिर संस्थानने तातडीने दखल घेत संबंधित वाहनावर अधिकृत नंबर प्लेट बसवली आहे. त्यामुळे आता हे वाहन नियमानुसार वापरले जात असून वृत्तपत्राने उपस्थित केलेल्या मुद्द्याची योग्य दखल घेतल्याबद्दल नागरिकांकडून समाधान व्यक्त केले जात आहे. नियम हे सर्वांसाठी समान असतात. त्यामुळे धार्मिक संस्था असो किंवा सामान्य नागरिक, प्रत्येकाने वाहतूक नियमांचे पालन करणे आवश्यक असल्याचे मतही नागरिकांनी व्यक्त केले आहे.

# मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते माडज येथील ग्रामीण प्रशालेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**माडज :-** महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळामार्फत आयोजित 'विश्वकोश ज्ञानवर्धन स्पर्धा 2026' मध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या ग्रामीण प्रशाला, माडज (ता. उमरगा) येथील विद्यार्थ्यांचा गौरव जिल्हा परिषद धाराशिवच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर यांच्या हस्ते करण्यात आला. राज्य शासनाच्या वतीने आयोजित या स्पर्धेचे आयोजन शहरी व ग्रामीण अशा दोन विभागांत करण्यात आले होते. ग्रामीण विभागातील राज्य, जिल्हा आणि तालुकास्तरीय स्पर्धांमध्ये ग्रामीण प्रशाला, माडजच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र,



स्मृतिचिन्ह व रोख पारितोषिक, तर सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. जिल्हास्तरीय स्पर्धेत समर्थ नंदकुमार जाधव याने प्रथम, प्रतिक विठ्ठल भोसले याने द्वितीय, तर प्रतीक्षा बाळू फुगटे हिने तृतीय क्रमांक मिळवला. या विद्यार्थ्यांना अनुक्रमे 3,000, 2,000 आणि 1,000 रोख पारितोषिक, प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात आले.तालुकास्तरीय स्पर्धेत ऋतुजा तानाजी शहापुरे, निकिता नवनाथ सूर्यवंशी आणि ईश्वर शिवशरणाप्पा कुंभार यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवत प्रत्येकी 1,000 व 500 रोख पारितोषिक, प्रमाणपत्र आणि पदक प्राप्त केले. या सर्व विद्यार्थ्यांना उपक्रमशील शिक्षक डॉ. बालाजी मदन इंगळे यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी भारत देवगुडे, वेतन अधीक्षक परतापुरे, डॉ. बालाजी मदन इंगळे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी,गवळी वाडा धाराशिव, ता. जि. धाराशिव, येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव)
संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-MAHMAR /2023/90078 कार्यालय; सुकर्मा कॅपिटल, बार्शी नाका, जिजाऊ चौक, धाराशिव-४१३५०१.मो. ९४२२०६८४२२. This letter was published by owner, printer, editor Chandrasen Govindrao Deshmukh, printed at Aadesh Printers, Ramkrishna Colony, Gawli Wada Dharashiv, Ta. Dist. Dharashiv, and published at Ramkrishna Colony, Gawli Wada, Dharashiv (Maharashtra).
» पुणे कार्यालयः1012,विंग B, पूर्वांचल,विबग्योर स्कूलशेजारी » कोल्हापूर कार्यालयः रिव्हॉल्युशन, दुसरा मजला, दाभोळकर कॉर्नर, स्टेशन रोड, करवीर.

## विविध वृत्त

# 35 वर्षांनंतर बी.एस्सी. च्या वर्गमित्रांचा स्नेहमेळावा

### जुन्या आठवणींना दिला उजाळा




**आरंभ मराठी । नळदुर्ग**

कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, नळदुर्ग येथील सन १९९०-९१ च्या बी.एस्सी. (मत्स्यशास्त्र) शाखेतील माजी विद्यार्थ्यांनी तब्बल ३५ वर्षांनंतर एकत्र येत स्नेहमेळाव्याचे (गेट-टुगेदर) आयोजन केले. या अनोख्या मेळाव्यात महाविद्यालयीन जीवनातील आठवणींना उजाळा देत सर्व वर्गमित्रांनी जुन्या क्षणांना पुन्हा एकदा उजाळा दिला. या स्नेहमेळाव्यात बी.एस्सी. फिशरी ग्रुपमधील सुमारे २० वर्गमित्र सहभागी झाले होते. तब्बल साडेतीन दशकांनंतर अनेक मित्रांची एकमेकांशी पुन्हा भेट झाल्याने सुरुवातीला काहींना एकमेकांची ओळख पटत नव्हती. मात्र, गप्पा रंगताच जुन्या आठवणी जाग्या झाल्या आणि वातावरण भावनिक झाले. या प्रसंगी तुळजापूर तालुक्यातील खानापूर येथील वर्गमित्र तथा लोहारा येथील नेत्रचिकित्सक डॉ. दस्तगीर मुजावर यांनी सलग ३० वर्षे वैद्यकीय क्षेत्रात उत्कृष्ट सेवा बजावल्याबद्दल त्यांच्या सेवापूर्ती निमित्त सर्व मित्रपरिवाराच्या वतीने त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास सत्कारमूर्ती डॉ. दस्तगीर मुजावर, डॉ. दीपक जगदाळे, डॉ. सिद्धेश्वर बाड, ॲड. सयाजी शिंदे, वसंत वडगावे, राजेंद्र काळप्पा, महेश कदम, मिलिंद कुलकर्णी, सुधीर पाटील, सोमनाथ गायकवाड, राहुल लिमये, उद्धव कोठे, किसन साखरे, धनराज बरबडे, संजय पंडित, डॉ. आनंद काटकर यांच्यासह इतर वर्गमित्र उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सिद्धेश्वर बाड यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. प्रसन्न कंदले यांनी केले, तर आभार एस. के. गायकवाड यांनी मानले.

# शिष्यवृत्ती परीक्षेत तेरच्या समर्थ पवारचे घवघवीत यश

### २३४ गुणांसह शिष्यवृत्तीसाठी पात्र

**आरंभ मराठी । तेर**



तेर येथील समर्थ सचिन पवार याने एप्रिल २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी करत २३४ गुण मिळवून शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरत घवघवीत यश संपादन केले आहे. सध्या धाराशिव येथील ग्रीनलँड स्कूलमध्ये इयत्ता सातवीत शिक्षण घेत असलेल्या समर्थने आपल्या गुणवत्तेच्या बळावर हे यश मिळवले आहे. त्याच्या या यशामुळे तेर गावासह शाळेच्या परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. समर्थच्या यशाबद्दल ग्रीनलँड स्कूलच्या संस्थापक श्रीमती स्वामी यांनी त्याचे कौतुक करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच वडील सचिन पवार, आई ज्योती पवार यांच्यासह ग्रामस्थ, शिक्षणप्रेमी नागरिक आणि मित्रपरिवाराकडून समर्थ पवार याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# भूमचे पोलीस निरीक्षक गणेश कानगुडे यांच्या बदलीची मागणी

### अन्यथा १४ ऑगस्टपासून तालुका बंदचा इशारा

**आरंभ मराठी । भूम**

भूम पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश कानगुडे यांच्या तात्काळ बदलीची मागणी करत नागरिक व सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी पोलीस आयुक्त, परिक्षेत्र छत्रपती संभाजीनगर यांना निवेदन सादर केले आहे. संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. निवेदनानुसार, भूम शहर व तालुक्यात विविध आंदोलनांमध्ये सहभागी झालेल्या आंदोलकांवर गुन्हे दाखल करण्यात आले, तर अनेक तक्रारींवर योग्य ती कारवाई करण्यात आली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच तालुक्यात मटका, जुगार, अवैध दारू आदी अवैध व्यवसाय राजरोसपणे सुरू असल्याचा दावा करण्यात आला आहे. काही प्रकरणांमध्ये आर्थिक व्यवहार तसेच नागरिकांशी अयोग्य वर्तन झाल्याचाही आरोप निवेदनकर्त्यांनी केला आहे. या सर्व आरोपांची निष्पक्ष चौकशी करून पोलीस निरीक्षक गणेश कानगुडे यांची तात्काळ बदली करण्यात यावी आणि भूम पोलीस ठाण्यात निष्पक्ष व कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याची नियुक्ती करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. दरम्यान, ही मागणी मान्य न झाल्यास १४ ऑगस्टपासून भूम शहरासह संपूर्ण तालुका बंद आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा सर्वपक्षीय पदाधिकारी आणि नागरिकांनी दिला आहे. यावेळी माजी नगराध्यक्ष विजयसिंहराजे थोरात, दिलीप शाळू महाराज, नगरसेवक रुपेश शेंडगे, चंद्रमणी गायकवाड, अनिल शेंडगे, विठ्ठल बागडे, नवनाथ रोकडे, रामराजे कुंभार, गणेश शाळू, रमेश मस्कर, हरिचंद्र पवार, विलास शाळू, संतोष सुपेकर, सिरज मोगल, सुनील वीर यांच्यासह सर्वपक्षीय पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तुळजापूरातील अरण्य गोवर्धन मठ व सोमवार गिरी मठात गुरुपौर्णिमा उत्सव साजरा



**तुळजापूर** :- तुळजापूर शहरातील अरण्य गोवर्धन मठ तसेच सोमवार गिरी मठ येथे गुरुपौर्णिमेचा उत्सव अत्यंत भक्तिभाव आणि धार्मिक वातावरणात साजरा करण्यात आला. विविध धार्मिक विधी, गुरु पूजन आणि महाप्रसादाच्या आयोजनामुळे दिवसभर भाविकांची मोठी उपस्थिती होती.अरण्य गोवर्धन मठात प्रारंभी मठाधिपती महंत व्यंकट अरण्य (गुरू शिवारण्य) महाराज यांच्या हस्ते दत्तमूर्तीचा अभिषेक व पूजन करण्यात आले. त्यानंतर गुरू-शिष्य परंपरेतील सर्व गुरुंच्या समाधींचे विधीवत पूजन करण्यात आले. प्रथेनुसार संपूर्ण समाजमंदिर वाड्याला प्रदक्षिणा घालून कुंडाचे पूजन करण्यात आले. यावेळी महंत इच्छागीरी महाराज यांच्या हस्ते महंत व्यंकट अरण्य महाराज यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास बाळकृष्ण अमृतराव, बापूसाहेब अमृतराव, शिवा अमृतराव, महेश अमृतराव, शितल अमृतराव, धनंजय अमृतराव, अतुल अमृतराव, अभिजित अमृतराव आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता महाप्रसादाने झाली. शेकडो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. दरम्यान, शहरातील सोमवार गिरी मठातही गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. महंत इच्छागीरी महाराज यांनी सर्व समाधींचे पूजन करून धार्मिक विधींना प्रारंभ केला. विधीवत पूजनानंतर अन्नदान महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. यावेळी शेकडो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रमास रुद्र पवार, चेतन शिंदे, जगदीश पलंगे, शहाजी जगदाळे आदी उपस्थित होते.

# बदलत्या वातावरणाचा आरोग्यावर परिणाम

## ■ भूम ग्रामीण रुग्णालयात सर्दी, खोकला व तापाच्या रुग्णांची संख्या वाढली

## ■ कधी ऊन, कधी पाऊस.. हवामानातील बदलामुळे नागरिक आजारी

**आरंभ मराठी । भूम**

**गेल्या काही दिवसांपासून वातावरणात सातत्याने होत असलेल्या बदलाचा नागरिकांच्या आरोग्यावर मोठा परिणाम होत असून भूम शहरासह संपूर्ण तालुक्यात सर्दी, खोकला, ताप, डोकेदुखी, अंगदुखी, घसा खवखवणे आणि अशक्तपणाच्या तक्रारींमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. कधी कडक ऊन, तर अचानक ढगाळ वातावरण आणि पावसाच्या सरी, तसेच दिवस-रात्रीच्या तापमानातील मोठ्या तफावतीमुळे नागरिक विविध आजारांना बळी पडत आहेत. परिणामी भूम ग्रामीण रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभागात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या वाढली असून विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि कमी प्रतिकारशक्ती असलेल्या व्यक्तींना या बदलाचा अधिक फटका बसत आहे.**

गेल्या काही दिवसांपासून वातावरणात सातत्याने होत असलेल्या बदलाचा नागरिकांच्या आरोग्यावर मोठा परिणाम होताना दिसत आहे. कधी कडक ऊन, तर अचानक ढगाळ वातावरण आणि पावसाच्या सरी, त्यातच दिवस व रात्रीच्या तापमानात होणारी मोठी तफावत यामुळे शहरासह तालुक्यातील नागरिकांमध्ये विविध आजारांचे प्रमाण वाढले आहे. विशेषतः सर्दी, खोकला, ताप, डोकेदुखी, अंगदुखी, घसा खवखवणे आणि अशक्तपणा अशा तक्रारी घेऊन नागरिक उपचारासाठी रुग्णालयात दाखल होत आहेत. सध्या भूम शहरातील ग्रामीण रुग्णालयात शहरासह तालुक्यातील विविध गावांमधून उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या वाढल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. सकाळी थंड वातावरण, दिवसभर वाढणारे तापमान आणि सायंकाळी पुन्हा बदलणारे हवामान यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. त्यामुळे ग्रामीण रुग्णालयात बाह्यरुग्ण विभागात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या वाढताना दिसत आहे. अनेक नागरिक सर्दी, खोकला किंवा तापासाठी स्वतःहून औषधे घेतात. मात्र, प्रत्येक आजाराचे कारण वेगवेगळे असू शकते. त्यामुळे डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषधे घेणे टाळावे. विशेषतः ताप वारंवार येत असल्यास किंवा अनेक दिवस टिकत असल्यास वैद्यकीय तपासणी करून घेणे आवश्यक आहे. सध्या ग्रामीण रुग्णालयात शहरासह तालुक्यातील नागरिक उपचारासाठी येत असल्याने रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता आरोग्य विभागाने प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर देणे आवश्यक आहे. वातावरणातील सततच्या बदलामुळे भूम शहर आणि तालुक्यात सर्दी, खोकला, ताप, डोकेदुखी, अंगदुखी आणि अशक्तपणाच्या तक्रारी वाढल्या आहेत.



### ग्रामीण रुग्णालयात रुग्णांची गर्दी

भूम शहर आणि तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांसाठी ग्रामीण रुग्णालय हे प्रमुख आरोग्य केंद्र आहे. सध्या बदलत्या हवामानामुळे सर्दी, खोकला आणि तापाच्या तक्रारी असलेल्या रुग्णांची संख्या वाढली आहे. अनेक रुग्णांना तापासोबत डोकेदुखी, अंगदुखी, थंडी वाजणे, घसा दुखणे आणि अशक्तपणा जाणवत असल्याने ते उपचारासाठी रुग्णालयात येत आहेत. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि बदलत्या हवामानाचा परिणाम लवकर होणाऱ्या नागरिकांमध्ये आजारांचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येत आहे. काही नागरिकांमध्ये सुरुवातीला सर्दी व खोकला असताना त्यानंतर ताप आणि डोकेदुखीची लक्षणे दिसून येत आहेत.

### तापमानातील चढ-उतार ठरत आहेत आरोग्यासाठी त्रासदायक

गेल्या काही दिवसांत हवामानात मोठ्या प्रमाणात बदल होत आहे. दिवसभर उष्ण वातावरण आणि अचानक पाऊस किंवा ढगाळ वातावरण निर्माण होत असल्याने तापमानात चढ-उतार होत आहेत. या बदलाचा परिणाम मानवी शरीरावर होतो. शरीराला बदलत्या वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी वेळ लागतो. त्यामुळे सर्दी, खोकला, ताप आणि डोकेदुखी यांसारख्या समस्या उद्भवू शकतात. पावसाळ्याच्या सुरुवातीच्या काळात वातावरणातील आर्द्रता वाढते. अशा वातावरणात विषाणूजन्य संसर्गाचा प्रसार होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे नागरिकांनी आरोग्याची विशेष काळजी घेणे गरजेचे आहे.

### लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांनी विशेष काळजी घेण्याची गरज

बदलत्या वातावरणाचा सर्वाधिक परिणाम लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांवर होतो. लहान मुलांमध्ये सर्दी, खोकला, ताप आणि घशाच्या तक्रारी वाढू शकतात. तर ज्येष्ठ नागरिकांमध्ये अशक्तपणा, डोकेदुखी, अंगदुखी आणि श्वसनाशी संबंधित त्रास जाणवू शकतो. पालकांनी मुलांना थंड पदार्थ, दूषित पाणी आणि उघड्यावरचे खाद्यपदार्थ देणे टाळावे. तसेच ज्येष्ठ नागरिकांनी अचानक तापमानातील बदलापासून स्वतःचा बचाव करावा.

### सर्दी-खोकला असलेल्या रुग्णांची संख्या वाढली

सध्या शहरातील अनेक भागांमध्ये नागरिकांना सर्दी आणि खोकल्याच्या तक्रारी जाणवत आहेत. काही नागरिकांना सतत खोकला, नाक वाहणे, घसा खवखवणे आणि डोकेदुखीचा त्रास होत आहे. काही रुग्णांमध्ये तापासोबत अंगदुखी आणि प्रचंड अशक्तपणा जाणवत असल्याने ते वैद्यकीय उपचार घेत आहेत. सर्दी किंवा खोकला झाल्यानंतर नागरिकांनी स्वतःहून औषधे घेण्याऐवजी डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. ताप अनेक दिवस राहणे, खोकला वाढणे किंवा श्वास घेण्यास त्रास होणे अशा लक्षणांकडे दुर्लक्ष करू नये.

# पुजारी नगर परिसरातील वाढत्या चोरींविरोधात नागरिकांचा संताप

### नियमित पोलीस गस्त वाढविण्याची मागणी

**आरंभ मराठी । तुळजापूर**



शहरातील नळदुर्ग रोडवरील पुजारी नगर परिसरात सातत्याने घडणाऱ्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनांना आळा घालण्यासाठी नियमित पोलीस गस्त वाढवून प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, या मागणीसाठी परिसरातील नागरिकांनी बुधवारी तुळजापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांना निवेदन दिले. निवेदनात म्हटले आहे की, पुजारी नगर सोसायटीमध्ये सुमारे १५० हून अधिक रो-हाऊस व निवासी घरे असून मोठ्या संख्येने नागरिक वास्तव्यास आहेत. गेल्या काही महिन्यांपासून परिसरात घरफोडीचे प्रयत्न, दुचाकी चोरी, घरासमोरील साहित्य, विद्युत उपकरणे तसेच इतर मौल्यवान वस्तू चोरीला जाण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढली आहे.

विशेषतः रात्रीच्या वेळी संशयित व्यक्तींचा वावर वाढल्याचे नागरिकांच्या निदर्शनास येत असून, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. वाढत्या चोरीच्या घटनांमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलीस प्रशासनाने तातडीने लक्ष घालण्याची मागणी करण्यात आली आहे. नागरिकांनी पुजारी नगर, हनुमान नगर, मस्के प्लॉटिंग, समता नगर, हेलिपॅड परिसर, श्रीराम नगर, शहाणे मंगल कार्यालय परिसर, फिल्टर टाकी परिसर, सहयोग नगर, छत्रपती शिवाजी नगर, विश्वनाथ नगर, हनुमान टेकडी, सप्ताळ नगर, अजिंक्य कॉलनी आणि ओम गणेश कॉलनी या भागांत नियमित पोलीस गस्त वाढविणे, रात्री विशेष गस्त पथके नियुक्त करणे, संशयित व्यक्तींवर बारकाईने लक्ष ठेवणे, आवश्यक त्या ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा उभारणीबाबत मार्गदर्शन करणे तसेच चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याची मागणी केली आहे. यावेळी उपनगराध्यक्ष रामचंद्र रोचकरी, प्रक्षाळ मंडळाचे अध्यक्ष विशाल रोचकरी, पुजारी नगर फाऊंडेशनचे अध्यक्ष गणेश पुजारी, उमाजी गायकवाड, श्रावण पवार, सिद्धेश्वर इंगोले, विकास कोळगे, सोमनाथ पुजारी, अनिल आगलावे यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# कारगिल विजय दिनानिमित्त कळंबमध्ये माजी सैनिकांची अभिवादन रॅली



**आरंभ मराठी । कळंब**

कारगिल विजय दिनानिमित्त रविवारी कळंब तालुक्यातील माजी सैनिकांनी एकत्र येत भारतीय सैन्याच्या शौर्य, पराक्रम आणि सर्वोच्च बलिदानाला अभिवादन केले. सकाळी अमर जवान स्मारक येथे पुष्पचक्र अर्पण करून कारगिल युद्धातील वीर जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर शहरातून शिस्तबद्ध अभिवादन रॅली काढण्यात आली. अमर जवान स्मारकापासून सुरू झालेली रॅली मुख्य महामार्ग, नगर परिषद उद्यान, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे पुन्हा अमर जवान स्मारकावर दाखल झाली. रॅलीदरम्यान छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर तसेच स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मारकांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. ज्येष्ठ माजी सैनिक ऑनररी कॅप्टन कमलाकर तांबारे, सोनाजी राजे आणि शेषेराव मुंढे यांच्या हस्ते अमर जवान स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. त्यानंतर सर्व माजी सैनिकांनी दोन मिनिटे मौन पाळून शहीद जवानांना श्रद्धांजली वाहिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पतसंस्थेचे चेअरमन एस. के. पुरी यांनी केले. यावेळी माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष श्रीकांत पाटील यांच्यासह लहू गिरी, अरुण आगवान, अंकुश तांबारे, दिलीप पावले, चंद्रकांत डांगरे, विजय चौधरी, श्रीकांत कळंबकर, आश्रुबा गुंजाळ, सुभाष पवार, बाळासाहेब व्हंडे, जालिंदर अनभुले, आण्णासाहेब लोमटे, शिवहारी लोमटे, शिवाजी टेळे, मेजर पालकर, मेजर खंडागळे, मेजर साळवे, रविंद्र जाधव, मेजर फरकाने, मेजर भराडे, राजाराम शिंदे, सुधाकर पाटील यांच्यासह तालुक्यातील अनेक माजी सैनिक गणवेशात उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

दैनिक आरंभ मराठी

## नळदुर्गमध्ये नागरी सुविधांसह भ्रष्टाचाराच्या चौकशीच्या मागणीसाठी आंदोलन

# नगर पालिकेसमोर काँग्रेसच्या 10 नगरसेवकांचे लाक्षणिक उपोषण

**आरंभ मराठी । नळदुर्ग**




नळदुर्ग शहरातील विविध प्रलंबित नागरी समस्या तातडीने सोडवाव्यात, प्रशासकीय कार्यकाळात करण्यात आलेल्या वृक्षलागवडीतील कथित भ्रष्टाचाराची जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सखोल चौकशी करण्यात यावी, तसेच दोषींवर गुन्हे दाखल करावेत, या प्रमुख मागण्यांसह विविध प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी काँग्रेस पक्षाच्या १० नगरसेवकांनी बुधवारी (दि.२९) नळदुर्ग नगरपालिकेसमोर सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण केले. या आंदोलनाला शहरातील विविध सामाजिक संघटना, शिवसेना (ठाकरे गट), सामाजिक कार्यकर्ते तसेच नागरिकांनी उपोषणस्थळी उपस्थित राहून जाहीर पाठिंबा दिला.

संविधान ग्रंथ समोर ठेवून नगरसेवकांनी उपोषण करत आपल्या मागण्यांना लोकशाही मार्गाने न्याय मिळावा, अशी भूमिका मांडली. उपोषणकर्त्यांनी दिलेल्या निवेदनात शहरातील मूलभूत नागरी सुविधा गंभीरपणे प्रभावित झाल्याचा आरोप केला. शहर स्वच्छतेचा प्रश्न दिवसेंदिवस बिकट होत असून नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी पाणीपुरवठ्याचे नियमित शुद्धीकरण करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. तसेच अमृत २.० पाणीपुरवठा योजना युद्धपातळीवर पूर्ण करावी आणि जलवाहिनी टाकण्यासाठी खोदण्यात आलेले रस्ते तातडीने पॅचवर्क करून पूर्ववत करण्यात यावेत, अशी मागणीही करण्यात आली. प्रशासकीय कार्यकाळात करण्यात आलेल्या वृक्षलागवडीत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा संशय व्यक्त करत या संपूर्ण प्रकरणाची जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सखोल चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी नगरसेवकांनी केली. तसेच नगरपरिषद सभागृहात मंजूर झालेल्या ठरावानुसार मुख्याधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करून प्रशासकीय कार्यकाळातील विकासकामांची चौकशी करण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली. याशिवाय सौरऊर्जा निर्मिती करणाऱ्या आवादा कंपनीने नगरपालिकेची आवश्यक परवानगी न घेता शहरात टॉवर उभारले असल्यास त्याची चौकशी करून संबंधित कंपनीवर नियमानुसार दंडात्मक कारवाई करावी, तसेच वारंवार मुदतवाढ देऊनही विकासकामे पूर्ण न करणाऱ्या कंपन्यांना काळ्या यादीत (ब्लॅकलिस्ट) टाकण्यात यावे, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली. उपोषणादरम्यान नगरपालिकेचे मुख्याधिकारी रामकृष्ण जाधवर यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन उपोषणकर्त्या नगरसेवकांशी चर्चा केली. नगरपालिकेकडून विविध मागण्यांवर सुरू असलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी दिली व पुढील आवश्यक कार्यवाहीबाबत आश्वासन दिले. या आंदोलनाला काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष ॲड. धीरज पाटील, तुळजापूर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष ॲड. अरविंद बेडगे, माजी नगराध्यक्ष नितीन कासार, माजी नगरसेवक सुधीर हजारे, सरदारसिंग ठाकूर, संतोष पुदाले यांच्यासह शहरातील विविध संघटनांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# मुरूम शहरात अतिक्रमण हटाव मोहीम; नगर परिषदेकडून अतिक्रमणावर बुलडोझर

## रहदारी परिसरातील अतिक्रमणांवर कारवाई मात्र पक्क्या अतिक्रमणांकडे दुर्लक्ष

आरंभ मराठी । मुरूम

**मुरूम शहरात नगरपरिषद प्रशासनाने बुधवारी (दि.२९) सकाळपासून पुन्हा एकदा अतिक्रमण हटाव मोहिमेला प्रारंभ केला. एक-दोन महिन्यांपूर्वी अतिक्रमणधारकांना नोटिसा बजावण्यात आल्यानंतर नगरपरिषदेने अचानक धडक कारवाई सुरू केली. या मोहिमेत नगरपरिषदेचे मुख्याधिकारी, अतिक्रमण विभाग प्रमुख, सर्व अधिकारी, कर्मचारी, कामगार तसेच पोलीस प्रशासन मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहरातील महात्मा बसवेश्वर चौकातून सुरू झालेली ही मोहीम छत्रपती शिवाजी महाराज चौक, अक्कलकोट रोड, बसस्थानक परिसर आदी भागांपर्यंत राबविण्यात आली.**

अनेक दुकानदारांनी स्वतःहून आपले टपरी दुकाने व साहित्य हटविले, तर जे साहित्य जागेवरच ठेवण्यात आले होते ते नगरपरिषदेने जेसीबी व ट्रॅक्टरच्या सहाय्याने जप्त केले. काही अतिक्रमणधारकांवर दंडात्मक कारवाईदेखील करण्यात आल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. मुरूम शहरात गेल्या दीड वर्षात ही तिसरी अतिक्रमण हटाव मोहीम आहे. यापूर्वी दोन वेळा कारवाई होऊनही पुन्हा अतिक्रमण झाले होते. त्यामुळे यावेळी सुरू झालेली मोहीम कितपत प्रभावी ठरते आणि शहर कायम अतिक्रमणमुक्त राहते का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

मात्र या कारवाईदरम्यान काही नागरिकांनी प्रशासनावर थेट प्रश्न उपस्थित केले. कारवाई सरसकट होत आहे की काहींची बाजू घेऊन निवडक अतिक्रमणांवरच बुलडोझर चालविला जात आहे? असा सवाल उपस्थित करण्यात आला. हातावर पोट असलेल्या छोट्या व्यावसायिकांवर कारवाई होत असताना काही पक्क्या अतिक्रमणांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोपही नागरिकांनी केला. अतिक्रमण हटाव मोहिमेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी नगरपरिषद प्रशासनाने पोलीस बंदोबस्ताचीही व्यवस्था केली होती.





### लोकप्रतिनिधींची प्रत्यक्ष उपस्थिती

अतिक्रमण हटाव मोहिमेदरम्यान सत्ताधारी पक्षाचे उपनगराध्यक्ष रमेश चव्हाण, नगरपरिषदेचे गटनेते गणेश अंबर व सुजित शेळके हे प्रत्यक्ष घटनास्थळी उपस्थित होते. कारवाईदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, तसेच प्रशासनाला सहकार्य मिळावे यासाठी त्यांनी परिस्थितीवर लक्ष ठेवले.

### पर्यायी जागा देण्याची मागणी

मोठ्या भाड्यामुळे आम्हाला दुकान घेणे परवडत नाही. रोजच्या उत्पन्नावरच आमच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. त्यामुळे रस्त्यालगत व्यवसाय करावा लागतो. नगरपरिषदेने आम्हाला कुणालाही अडचण होणार नाही अशा ठिकाणी अधिकृत जागा उपलब्ध करून द्यावी. आम्हीही नियम पाळण्यास तयार आहोत अशी मागणी काही अतिक्रमण धारकांनी केली.

### अगोदर पुनर्वसन करावे आणि नंतर अतिक्रमण हटवावे

नगरपरिषदेने अतिक्रमण हटविण्याची कारवाई केली, ती कायद्याच्या चौकटीत असू शकते. मात्र या कारवाईत बहुतांश हातावर पोट असलेल्या सर्वसामान्य व्यावसायिकांवरच गदा आली आहे. त्यांच्या पुनर्वसनाची किंवा पर्यायी जागेची व्यवस्था करणे ही नगरपरिषदेची नैतिक जबाबदारी होती. निवडणुकीच्या काळात नगराध्यक्षांनी याच व्यावसायिकांना विविध आश्वासने देऊन मते घेतली आणि आज त्यांच्याच उदरनिर्वाहावर बुलडोझर चालविणे योग्य वाटत नाही. प्रशासनाने मानवी दृष्टिकोन ठेवत प्रथम पर्यायी व्यवस्था करावी आणि त्यानंतरच अशा कारवाया कराव्यात.

**लखन भोंडवे**
**विद्यार्थी चळवळीचे नेतृत्व, मुरुम शहर.**

### पुन्हा अतिक्रमण होणार नाही याकडे लक्ष देणार

मुरूम शहरात यापूर्वीही अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात आली होती. मात्र काही दिवसांनी पुन्हा अतिक्रमण करण्यात आल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे यावेळी केवळ कारवाई करून थांबणार नाही, तर पुन्हा अतिक्रमण होणार नाही यासाठी सातत्याने लक्ष ठेवले जाणार आहे. नियमांचे उल्लंघन करून रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्यांवर मोठ्या प्रमाणात दंडात्मक कारवाई करण्यात येईल. शहरातील रस्ते, पदपथ व सार्वजनिक जागा अतिक्रमणमुक्त ठेवणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करून सार्वजनिक ठिकाणी अतिक्रमण करू नये.

**राहुल यादव,**
**अतिक्रमण विभाग प्रमुख, नगरपरिषद मुरुम.**

### कारवाई सरसकट करा; पक्की अतिक्रमणेही हटवा

शहरातील सर्वच अतिक्रमणे हटवली जात असतील तर ती शहरासाठी स्वागतार्ह बाब आहे. मात्र हातावर पोट असलेल्या नागरिकांवर कारवाई करून सरकारी दवाखाना, कन्याशाळा परिसर व इतर ठिकाणच्या पक्क्या अतिक्रमणांकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही. कोणताही भेदभाव न करता सर्व प्रकारची अतिक्रमणे सरसकट हटविण्यात यावीत.

**सिद्धलिंग हिरेमठ**
**सामाजिक कार्यकर्ते, मुरुम.**

# कंटेकुरमध्ये कांता चारिटेबल ट्रस्टचा स्तुत्य उपक्रम

## विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्याचे वाटप



आरंभ मराठी । कंटेकुर

शिक्षणाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने कांता चारिटेबल ट्रस्टच्या वतीने कंटेकुर येथे विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. ट्रस्टचे सर्वेसर्वा धनराज जाधव व नुपूर जाधव यांच्या पुढाकारातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाची सुरुवात भारतातील पहिल्या महिला शिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, नोटबुक आणि पेन संचाचे मोफत वितरण करण्यात आले. शालेय साहित्य मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम असल्याचे सांगत, अशा सामाजिक उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोठा आधार मिळत असल्याचे मत व्यक्त केले. गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याच्या कांता चारिटेबल ट्रस्टच्या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले. कार्यक्रमास शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व पदाधिकारी, कंटेकुर, मुरळी आणि कदेर येथील सरपंच, उपसरपंच, सदस्य, प्रतिष्ठित नागरिक, युवक, सामाजिक कार्यकर्ते, ग्रामस्थ, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, महिला तसेच आशा सेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# गुरुपौर्णिमेनिमित्त तेरमध्ये धनगर समाजाची पारंपरिक 'परज' मिरवणूक; भंडाऱ्याची उधळण, नृत्याने भक्तिमय वातावरण

**तेर** :- धाराशिव तालुक्यातील तेर येथे गुरुपौर्णिमेनिमित्त धनगर समाजाच्या वतीने पारंपरिक 'परज' मिरवणुकीचे उत्साहात आयोजन करण्यात आले. भंडाऱ्याची उधळण, पारंपरिक नृत्य आणि जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला. तसेच आचार्य परिवाराच्या वतीने गेल्या सात दिवसांपासून सुरू असलेल्या श्रीमद्‌भागवत कथा सप्ताहाची बुधवारी (दि. २९) सांगता करण्यात आली. धनगर समाजातील युवकांनी पारंपरिक वेशभूषेत आकर्षक नृत्य सादर करत गणपती चौकातून परज मिरवणुकीला प्रारंभ केला. ही मिरवणूक गणपती चौक, जुने बसस्टँड, जुनी ग्रामपंचायत, पानभर वेस पेठ मार्गे बिरोबा मंदिरापर्यंत काढण्यात आली. मार्गभर भंडाऱ्याची उधळण करण्यात आली. बिरोबा मंदिर परिसरात धनगर समाजाच्या वतीने पारंपरिक नृत्य सादर करण्यात आले. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करून परज मिरवणुकीची सांगता करण्यात आली. यावेळी भागवत भक्ते, फुलचंद पसारे, दत्ता भक्ते,



अमृषी भक्ते, दादा पसारे, हनुमंत पसारे, शामराव गायके, वैजनाथ पसारे, कृष्णा भक्ते, हनुमान पसारे, राजेंद्र पसारे, नवनाथ पसारे, नानासाहेब भक्ते, धनाजी भक्ते, मच्छिंद्र भक्ते, सिद्धेश्वर पसारे, केशव पसारे, सोमनाथ सौदागर, गजेंद्र सौदागर, हरी भक्ते, खंडू शिरगिरे यांच्यासह धनगर समाजातील मोठ्या संख्येने समाजबांधव सहभागी झाले होते. दरम्यान, ह.भ.प. भागवताचार्य बाळासाहेब आचार्य यांच्या निवासस्थानी गेल्या सात दिवसांपासून सुरू असलेल्या श्रीमद्‌भागवत कथा सप्ताहाचीही बुधवारी सांगता झाली. या निमित्ताने दोन्ही ठिकाणी भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

# गुरुपौर्णिमेनिमित्त श्रीपतराव भोसले ज्युनिअर कॉलेजमध्ये गुरुजनांचा गौरव

आरंभ मराठी । धाराशिव

श्रीपतराव भोसले ज्युनिअर कॉलेज, धाराशिव येथे गुरुपौर्णिमा उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. ज्ञानदेवता सरस्वती व महर्षी वेदव्यास यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी गुरुजनांना पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन कृतज्ञता व्यक्त करत त्यांचा सन्मान केला. प्राचार्य नंदकुमार नन्नवरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, गुरु हे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे खरे शिल्पकार असून ज्ञानासोबतच संस्कार, शिस्त आणि आत्मविश्वासाची जडणघडण करणारे मार्गदर्शक आहेत. गुरुपौर्णिमा हा गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा पवित्र दिवस आहे, असे सांगितले. उपप्राचार्य संतोष घार्गे यांनी विद्यार्थ्यांनी अध्यात्म आणि विज्ञान यांचा समतोल साधत ज्ञानाबरोबरच संस्कारही जोपासावेत, असे आवाहन केले. पर्यवेक्षक मोहन शिंदे यांनी 'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः...' या श्लोकाचे महत्त्व विशद करत गुरु हे विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा देणारे प्रेरणास्थान असल्याचे सांगितले. पर्यवेक्षक कैलास कोरके यांनी भारतीय गुरुकुल परंपरा, महर्षी वेदव्यासांचे योगदान, गुरु-शिष्य परंपरेचा इतिहास आणि आधुनिक शिक्षण व्यवस्थेतील



शिक्षकांची भूमिका याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमात कु. पूजा मेनकुदळे, कु. श्रावणी जाधव आणि कु. अक्षता कुऱ्हाडे यांनी गुरुपौर्णिमेचे महत्त्व सांगणारी मनोगते व्यक्त केली. तसेच कु. अक्षता कुऱ्हाडे यांनी गुरुची महती सांगणारी कविता सादर केली व इंग्रजी भाषणातूनही उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. प्रतिभा पाटील, कु. पुनम गाडे आणि कु. सानिका सारोळकर यांनी केले, तर आभारप्रदर्शन कु. मानसी सोनटक्के यांनी केले.

या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांना प्रा. पिंटू गवारे, प्रा. सूर्यकांत कापसे, प्रा. दत्तात्रय जाधव, प्रा. दगडू घोडके आणि प्रा. मनोज डोलारे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होतेकार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थाध्यक्ष सुधीर अण्णा पाटील, सरचिटणीस प्रेमाताई पाटील, सीईओ आदित्य पाटील तसेच प्रशासकीय अधिकारी डॉ. मंजुळाताई पाटील यांचे सहकार्य लाभले.

दैनिक आरंभ मराठी — हेक्टरी 3,500 ते 16,000 रुपयापर्यंत पीक विमा भरपाई; बँका, एटीएम आणि सेवा केंद्रांवर शेतकऱ्यांची गर्दी

# भूम तालुक्यात पीक विम्याची रक्कम खात्यात जमा होण्यास सुरुवात; सात मंडळातील शेतकऱ्यांना दिलासा

आरंभ मराठी । भूम

प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत मागील वर्षी पीक विमा भरलेल्या भूम तालुक्यातील शेतकऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये पीक विमा परताव्याची रक्कम मंगळवार (दि.२८) पासून जमा होण्यास सुरुवात झाली आहे. विविध मंडळातील शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये रक्कम जमा झाल्याचे संदेश प्राप्त होताच शेतकऱ्यांनी बँका, एटीएम व संबंधित सेवा केंद्रांकडे धाव घेतली. त्यामुळे भूम शहरासह तालुक्यातील विविध बँकांमध्ये शेतकऱ्यांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. सन २०२५-२६ मध्ये अतिवृष्टी, पावसातील दीर्घ खंड तसेच प्रतिकूल हवामानामुळे भूम तालुक्यातील अनेक भागांतील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. या नुकसानीमुळे अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले होते. खरीप हंगामातील उत्पादन घटल्याने अनेकांना कर्जाचा आधार घ्यावा लागला होता. त्यामुळे पीक विमा परताव्याची शेतकरी आतुरतेने प्रतीक्षा करत होते. आता ही रक्कम खात्यात जमा होण्यास सुरुवात झाल्याने शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला असून तालुक्यात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. पीक विम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होताच अनेकांनी आपल्या मोबाईलवर आलेले बँकेचे संदेश तपासले. काही शेतकरी बँक खात्याचा तपशील जाणून घेण्यासाठी एटीएम, बँक शाखा तसेच विविध ऑनलाइन सेवा केंद्रांवर पोहोचले. त्यामुळे दिवसभर बँकांमध्ये आणि ग्राहक सेवा केंद्रांवर मोठी गर्दी दिसून आली. मिळालेल्या पीक विमा परताव्यामुळे खरीप हंगामातील

**भूम तालुक्यातील विविध मंडलांसाठी मंजूर झालेल्या परताव्याच्या दरानुसार शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी पुढीलप्रमाणे रक्कम मिळत आहे.**

**माणकेश्वर मंडळ : 16,000 रुपये प्रति हेक्टरी**
**इट मंडळ : 15,000 रुपये प्रति हेक्टरी**
**पाथरूड मंडळ : 3,500 रुपये प्रति हेक्टरी**
**वालवड मंडळ : 14,000 रुपये प्रति हेक्टरी**
**आष्टा मंडळ : 16,000 रुपये प्रति हेक्टरी**
**आंबे मंडळ : 3,500 रुपये प्रति हेक्टरी**
**भूम मंडळ : 13,000 रुपये प्रति हेक्टरी**

शेतीकामे, बियाणे, खते, औषधे, पीक संरक्षण, कोळपणी तसेच इतर आवश्यक शेती खर्च भागविण्यास मदत होणार असल्याची भावना अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केली. आर्थिक अडचणीच्या काळात ही रक्कम मोठा आधार ठरणार असल्याचेही शेतकरी सांगत आहेत. दरम्यान, सर्व पात्र शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये रक्कम एकाच वेळी जमा होईलच असे नाही. विमा रक्कम टप्प्याटप्प्याने जमा होण्याची शक्यता असल्याने ज्या शेतकऱ्यांच्या खात्यात अद्याप रक्कम जमा झालेली नाही, त्यांनी घाबरून न जाता काही दिवस प्रतीक्षा करावी, असे आवाहन करण्यात येत आहे. शेतकऱ्यांनी आपले बँक खाते आधार क्रमांकाशी जोडलेले आहे का, खाते सक्रिय आहे का तसेच बँक खात्याची माहिती अचूक आहे का, याची खात्री करून घ्यावी, असेही सांगण्यात आले आहे.

### आर्थिक दिलासा मिळाला

सन २०२५–२६ मध्ये अतिवृष्टीमुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. त्यामुळे अनेक शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबले होते. आता पीक विम्याची रक्कम खात्यात जमा होऊ लागल्याने शेतकऱ्यांना काहीसा आर्थिक दिलासा मिळाला असून त्यांच्यामध्ये समाधानाचे वातावरण आहे.

**सुधीर कुलकर्णी**
**शेतकरी, सावरगाव.**

### शेतीकामासाठी आर्थिक मदत झाली

गेल्या वर्षी झालेल्या पीक नुकसानीपोटी शेतकऱ्यांच्या खात्यात प्रति हेक्टर 16,000 प्रमाणे पीक विम्याची रक्कम जमा झाली आहे. या रकमेमुळे चालू हंगामातील पीक संरक्षण, कोळपणी व इतर शेतीकामांसाठी शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना या विमा भरपाईमुळे काही प्रमाणात आधार मिळाला आहे.

**संतोष देशमुख,**
**शेतकरी, भूम.**

# मुरुडमध्ये शिवरायांना दररोज अभिवादनाची अनोखी परंपरा

## सर्वधर्मीयांच्या सहभागातून सामाजिक ऐक्याचा संदेश

आरंभ मराठी । मुरुड

छत्रपती शिवाजी महाराजांविषयीची नितांत श्रद्धा आणि त्यांच्या विचारांचे जतन करण्याच्या उद्देशाने मुरुड शहरात दररोज सकाळी शिवरायांना अभिवादन करण्याची प्रेरणादायी परंपरा सुरू असून, या उपक्रमात सर्व जाती-धर्मातील नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभत आहे.

मुरुड येथील व्यापारी सतीश सुभाष सवासे आणि धनंजय मारुती भोरकर या दोन शिवप्रेमी मित्रांनी हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे. व्यापारी असलेले हे दोघे दररोज सकाळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करतात. त्यानंतरच ते आपल्या व्यावसायिक आस्थापनांची सुरुवात करतात. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे दररोज एका वेगळ्या व्यक्तीला शिवरायांना पुष्पहार अर्पण करण्याचा मान दिला जातो. या अभिवादन सोहळ्यात शिवप्रेमींसह सर्व जाती-धर्मातील व्यापारी, नागरिक, महिला, युवक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होत असल्याने सामाजिक ऐक्य आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला जात आहे. दररोजच्या या उपक्रमामुळे छत्रपती शिवाजी महाराज चौकाची नियमित स्वच्छताही केली जाते. शिवरायांचे स्वराज्य, स्वाभिमान, शिस्त आणि लोककल्याणाचे विचार समाजापर्यंत पोहोचविण्याचे काम या माध्यमातून होत असल्याची भावना सहभागी नागरिकांनी व्यक्त केली. विशेष म्हणजे,



दररोज अभिवादनाचा मान मिळालेल्या व्यक्तीचा फोटो आणि नाव गावातील विविध व्हॉट्सॲप समूहांवर प्रसिद्ध केले जाते. त्यामुळे अधिकाधिक नागरिक या उपक्रमाशी जोडले जात असून, शिवरायांविषयीची श्रद्धा आणि समाजात सकारात्मक विचारांची जपणूक करण्यास या उपक्रमाची मोठी मदत होत आहे. मुरुड शहरातील ही सातत्यपूर्ण आणि आगळीवेगळी परंपरा छत्रपती शिवाजी महाराजांप्रती असलेली निष्ठा, सामाजिक एकोपा आणि स्वच्छतेचा संदेश देणारा आदर्श उपक्रम ठरत असून, राज्यभर अशा उपक्रमांची गरज असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## सांगवी मार्डीतील सार्वजनिक सभागृहावर अतिक्रमण; ग्रामपंचायतीने कारवाई करण्याची मागणी

आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर तालुक्यातील सांगवी मार्डी येथे गावकऱ्यांच्या वापरासाठी उभारण्यात आलेल्या सार्वजनिक सभागृहावर अतिक्रमण करून अनधिकृतपणे खोली बांधण्यात आल्याचा आरोप होत असून, याप्रकरणी ग्रामपंचायतीने तातडीने कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. तत्कालीन आमदार मधुकरराव चव्हाण यांच्या आमदार निधीतून गावातील मारुती मंदिर परिसरातील गावठाण जागेत सार्वजनिक सभागृह उभारण्यात आले होते. मात्र, काही दिवसांपूर्वी सभागृहाच्या भिंतीचा काही भाग पाडून त्याठिकाणी पत्र्याच्या




## दिल्लीतील राष्ट्रीय स्पर्धेत धाराशिवच्या लाठीपटूंची पदकांची लयलूट; उमरग्यात भव्य सत्कार



आरंभ मराठी

लक्झरी ट्रॅव्हल्समधून प्रवाशांच्या बॅगा फोडून 63 हजारांचा ऐवज चोरी

आरंभ मराठी | वाशी

धाराशिव जिल्ह्यातील वाशी फाटा ते पारगाव टोलनाका दरम्यान धावत्या लक्झरी ट्रॅव्हल्समध्ये अज्ञात चोरट्यांनी प्रवाशांच्या बॅगांमधील रोख रक्कम व आर्टिफिशियल दागिने लंपास केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी अनुराग रणछोडलाल राठोड (वय 34, रा. मेघनगर, ता. मेघनगर, जि. झाबुआ, मध्यप्रदेश) हे एमपी 09 एएस 9499 क्रमांकाच्या लक्झरी ट्रॅव्हल्सने प्रवास करत

येणेगूरमध्ये 'विठ्ठल नामाची





शाळा';